पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# <u>वार्तापत्र</u>

*दिनांक- २०/१२/२०१९*

## हेडरी उपविभागाने जिंकला यंदाचा विर बाबुराव सेडमाके कब्बडी स्पर्धेचा विजेतेपदाचा चषक

- **मा. पोलीस महासंचालक श्री. सुबोधकुमार जायसवाल यांच्या हस्ते देण्यात आली विजेतेपदाचे ट्रॉफी**

गेल्या एक महीण्यापासुन जिल्हाभरात पोस्टे/उप पोस्टे/पोमके स्तरावर गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने “विर बाबुराव सेडमाके ” कब्बड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला जिल्हयाभरातील तरुणांनी प्रचंड प्रतिसाद देत जिल्हाभरातील ८६९ संघ व १०,४२८ खेळाडुंनी सहभाग नोंदविल. पोस्टे / उपपोस्टे/पोमके स्तरावरील ८६९ संघापैकी विजेता ठरलेल्या ५८ संघानी उपविभागीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्र ठरले. उपविभागीय स्तरावर झालेल्या ५८ संघापैकी १० संघाची निवड जिल्हैस्तरावर होणाऱ्या स्पर्धेसाठी करण्यात आली. या संघामध्ये गेली २ दिवसापासुन पोलीस मुख्यालय मैदानावर रोमहर्षक लढती पार पडल्या. यामध्ये हेडरी संघाने बाजी मारत विजेतेपदाच्या चषकावर आपले नाव कोरले तर अहेरीच्या संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. तर तिसऱ्या क्रमांक गडचिरोली उपविभागाच्या संघाने पटकाविला. स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविणा-या विद्यार्थ्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्हव प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम मा. पोलीस महासंचालक श्री. सुबोध कुमार जायसवाल यांच्या आज शहीद पांडु आलाम सभागृहात पार पडला. या वेळी रश्मी शुक्ला (अपर पोलीस महासंचालक राज्य गुप्तवार्ता विभाग म.रा.), राजेंद्रसिंग (अपर पोलीस महासंचालक विशेष कृती म.रा.), देवेन भारती (अपर पोलीस महासंचालक दहशतवाद विरोधी पथक म.रा.),, महादेव तांबडे (पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र गडचिरोली.), शेखरसिंग (जिल्हा अधिकारी गडचिरोली), तसेच शैलेश बलकवडे पोलीस अधीक्षक इत्यादी मान्यवर उपस्थितीत होते.



पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

## वार्तापत्र

*दिनांक- २०/१२/२०१९*

# वीर बाबुराव शेडमाके सामान्य ज्ञान परिक्षेत अर्चना बापु सडमेक जिल्ह्यात प्रथम

नक्षल प्रभावित अतिसंवेदनशिल गडचिरोली जिल्हयाचा लोकशाही व शांततेच्या मार्गाने विकास कसा साधला जाईल. याकरिता गडचिरोली पोलीस दलातर्फे विविध नाविन्यपुर्ण उपक्रम व योजना राबविण्यात येत आहेत. गडचिरोली जिल्हयातील अतीदुर्गम व दुर्गम भागातील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची सर्वांगीण विकास होणेच्या दृष्टीने तसेच त्यांचे बौध्दीक कला-गुणांना वाव मिळून त्यांना स्पर्धा परिक्षेची माहिती व्हावी आणि त्यांच्या ज्ञानात भर पडावी व भविष्यातील प्रशासकीय अधिकारी घडविण्यासाठी प्रयास उपक्रमाची सुरुवात गडचिरोली पोलीस दलाने केली आहे.

गडचिरोली जिल्हा पोलीस दलातर्फे प्रयास उपक्रमा अंतर्गत दररोज जिल्ह्यातील प्रत्येक आश्रमशाळेत १० सामान्य ज्ञानाचे प्रश्न व्हाट्सअॅप द्वारे संबंधीत आश्रमशाळेतील समन्वय म्हणून नियुक्त केलेल्या शिक्षकांना पाठविले जातात. सदर शिक्षकांमार्फत सदरचे प्रश्न दैनंदिन परिपाठाच्या माध्यमातून त्यांचे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना माहिती करुन देण्यात येतात. विर बाबुराव शेडमाके सामान्यज्ञान स्पर्धेची तिमाही परिक्षा दिनांक २३ ऑगस्ट २०१९ रोजी पार पडली. या स्पर्धेत संपूर्ण जिल्ह्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील १०२ आश्रमशाळांतील २१,५४७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक भगवंतराव आश्रमशाळा, गुंडापल्ली येथील अर्चना बापु सडमेक, व्दितीय क्रमांक शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, सावरगाव येथील भुमिका सूकालू बोगा, तृतीय क्रमांक शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, जारावंडी येथील करिना महेश टोहलिया यांनी पटकाविला.

सदर विजेत्या स्पर्धकांना अनुक्रमे ३१००/-, २१००/-, १५०००/ मा. श्री. सुबोध कुमार जायसवाल, पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या हस्ते रोख रक्कम व प्रशस्तीपत्र देवुन सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीमती रश्मी शुक्ला (अपर पोलीस महासंचालक राज्य गुप्तवार्ता विभाग म.रा.), मा. श्री. राजेंद्रसिंग (अपर पोलीस महासंचालक विशेष कृती म.रा.), मा. श्री. देवेन भारती (अपर पोलीस महासंचालक दहशतवाद विरोधी पथक म.रा.),मा. श्री. महादेव तांबडे (पोलीस उपमहानिरीक्षक गडचिरोली परिक्षेत्र गडचिरोली.), मा. श्री. शेखर सिंग (जिल्हाधिकारी गडचिरोली), तसेच मा. श्री. शैलेश बलकवडे पोलीस अधीक्षक इत्यादी मान्यवर उपस्थितीत होते.

